**<u>सरकारतर्फे साक्षीदार क्र.०२ चा शपथेवर जबाब –</u>**

माझे नाव – जालींदर मुरलीधर माने

माझे वय – ३५ वर्षे

व्यवसाय – पोलीस कॉन्स्टेबल, स्थानीक गुन्हे शाखा, अहिल्यानगर

राहाणार – ता.शेवगाव, जि. अहमदनगर.

**<u>सरतपास विधीज्ञ श्री.एस.पी.तडके यांचे मार्फत शपथेवर सुरु</u>** –

१. घटना ही दिनांक १९.०५.२०२४ रोजी निमगाव वाघा येथे घडली. त्यावेळी मी, सहा.फौजदार भाऊसाहेब काळे, हे.कॉ.ए.सी.लोटके असे नगर तालुका पोलीस स्टेशन हद्दीत अवैध व्यवसायावर कारवाई करण्यासाठी पेट्रोलींग करत होतो. भाऊसाहेब काळे यांना गुप्त बातमीदारा कडुन माहिती मिळाली की निमगाव वाघा येथे एक इसम गावठी हातभट्टीची दारू तयार करत आहे. त्यानंतर आम्ही नगर तालुका पोलीस ठाण्यास येथे जावुन हे.कॉ.खंडेराव शिंदे आणि रेपाळे यांना त्याबाबतची माहिती सांगितली. त्यांनी एल.सी.बी.ऑफीसमध्ये दोन पंच बोलावुन घेतले. त्यानंतर आम्ही खाजगी वाहनाने निमगाव वाघा येथे गेलो आणि छापा टाकला. त्याठिकाणी आम्हाला एक इसम दिसला. तो हातभट्टीची दारू तयार करत होता. त्याला ताब्यात घेवुन त्याचे नाव गाव विचारले असता त्याने त्याचे नाव कुमार दादाभाऊ फलके, वय ३५ वर्षे असे सांगितले. छापा टाकला ते ठिकाण आरोपीच्या घराच्या पाठीमागे होते.

२. साधारणत: त्याच्या ताब्यात ३०० लिटरचे कच्चे रसायन मिळुन आले आणि ३५ लिटर तयार गावठी हातभट्टी दारू मिळुन आली. त्याची अंदाजे किंमत रूपये १८,५००/– होती. त्यातुन दोन १८० मि.ली.च्या काचेच्या

बाटल्या रासायनिक तपासणीकरिता रसायन वेगळे काढले. उर्वरित मुद्देमाल जागीच नाश केला. वेगळे काढलेल्या रसायनाच्या बाटल्या पंचांसमक्ष बंद करून त्यावर गुन्हयाबाबत माहिती असलेले कागदी लेबल चिटकवले आणि लाखसिल बंद केले. पंचांसमक्ष दिसत्या परिस्थितीचा माझे समक्ष पंचनामा तयार केला. त्यानंतर पोलीस ठाण्यात येवुन तक्रार दिली. आता मला फिर्याद दाखविली. त्यातील मजकुर बरोबर असुन त्यावर माझी सही आहे. त्याला **नि.क्र.१५** देण्यात आली. आरोपीला पाहिल्यास ओळखु शकतो. आज आरोपी न्यायालयात हजर नाही. मला आता छापील एफ आय आर दाखविण्यात आली. त्याला **नि.क्र.१६** देण्यात आली.

सरतपास पुर्ण.

**उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री.आर.पी.गोरे यांचेतर्फे सुरू –**

३. हे म्हणणे खरे आहे की, आम्हाला छापा टाकण्याबाबत किंवा पेट्रोलींगबाबत लेखी आदेश नव्हते. आम्हाला मिळालेल्या गुप्त बातमीबद्दल आम्ही बनावट ग्राहक पाठवुन खत्री केली नाही. हे म्हणणे खरे आहे की, पंचांची नावे फिर्यादमध्ये नमुद नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, ज्या खाजगी वाहनाने गेलो त्याचे वर्णन फिर्यादमध्ये नमुद नाही. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही प्रत्यक्षात कुठलाही छापा टाकला नाही आणि आम्हाला आरोपीच्या ताब्यातुन कुठलाही मुद्देमाल मिळाला नाही. हे म्हणणे खरे नाही की, पंचनामा आमच्या कार्यालयात बसुन करण्यात आला. हे म्हणणे खरे नाही की, राजेंद्र भागुजी पालवे आणि दादु चक्रवर्ती हे ब–याचशा केसेसमध्ये पंच म्हणुन बोलावले आहे. हे म्हणणे खरे नाही की, १८० मि.ली. नमुने वेगळे काढुन ठेवल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे

नाही की, सरतपासातील संपुर्ण मजकुर खोटा सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, केवळ प्रोहीबीशनचे कुठलेतरी कारवाईचे काम सुरू आहे हे वरिष्ठांना दाखविण्याकरता आम्ही आरोपीविरूध्द खोटी फिर्याद दाखल केली. हे म्हणणे खरे नाही की, आज खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

**साक्षीदाराचा जबाब नोंदवितांना डायसलगतचे स्क्रीन व भिंतीवरील स्क्रीन चालु केले होते व त्यांचे समक्ष संगणकावर साक्ष नोंदवण्यात आली.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत

जबाब माझे समक्ष व उपस्थितीत नोंदवला.

सही/–

(माधुरी रा.खनवे)

दिनांक ११/०९/२०२५

अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,

कोर्ट नं.०५, अहमदनगर